**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.38, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, SEPT-OCT, 2019, VOL- 7/53*

# मराठी माध्यमाच्या इ. पाचवीच्या विद्यार्थ्यांमध्ये उपयोजनात्मक पातळीवर विकसित झालेल्या मराठी भाषेतील शब्दसंपत्तीचे विश्लेषण करून त्यांचा तुलनात्मक अभ्यास

**अतुल प्रकाश कुलकर्णी, Ph. D.**
*विभागप्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग, म.ए.सो. आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे, महाराष्ट्र*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

- **प्रास्ताविक :—**

बालक जसजसे मोठे होत जाते तसे ते घरातील व्यक्ती, आजूबाजुच्या व्यक्ती यांचेकडून अनेक शब्द ऐकत असते. हळूहळू ते शब्द प्रयोग करायला शिकते. मात्र त्याला त्या शब्दांचा अर्थ माहित नसतो. अनुभवाने शब्दांचा अर्थ कळातो. मात्र त्याचे नक्की उपयोजन कसे करायचे हे माहित नसते. त्यामुळे अनेक वेळा चुकीच्या वेळेला चुकीचे शब्द वापरले जातात. याचप्रमाणे शाळेत गेल्यावर अनेक शब्द ज्ञात होतात. पण त्यांचे उपयोजन जर लक्षात नाही आले तर विचार मांडता येत नाहीत. काहीजण नुसते वाचत असतात त्यामुळे त्यांचेकडे शब्द खूप असतात. मात्र त्यांचा उपयोग नक्की कुठे व कसा करायचा हे अवगत नसेल तर विचारांचा प्रभाव पडत नाही. भाषण व लेखन या क्षमता शब्द संपत्तीच्या उपयोजनाशी संबंधित असतात.

- **संशोधनाचीगरज :—**

कोणत्याही ज्ञानाची उपयोजन क्षमता ही एक अत्यंत महत्त्वाची आहे. तसेच शब्दांचे उपयोजन ही एक महत्त्वाची क्षमता आहे. शब्द माहिती आहेत पण उपयोग करता येत नाही असे असेल तर शब्द संपत्ती विकसित झाली असे म्हणता येत नाही. याचाच अर्थ विद्यार्थ्यांला शब्दांचा वाक्यात योग्य उपयोग करता आला पाहिजे. शब्दांची विविध रूपे तयार करता आली पाहिजेत. काळ, वचन, यानुसार वाक्यात उपयोजन करता आले पाहिजे. हे विद्यार्थ्यांना कितपत जमते, त्यांचीही क्षमता किती प्रमाणत विकसित झाली आहे हे तपासण्यासाठी प्रस्तुत अभ्यास महत्त्वाचा आहे.

- **न्यादर्श :—**

प्रस्तुत संशोधनासाठी अहमदनगर जिल्ह्यातील शहरी भागातून ११००, ग्रामीण भागातून२००० व आदिवासी भागातून २०० विद्यार्थ्यांची सूगम यादृच्छिक लॉटरी पध्दतीच्या सहाय्याने न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली.

- **संशोधनपध्दती :—**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्व्हेक्षण पध्दतीतील संपादन परीक्षण पध्दतीचा उपयोग केला गेला.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

- **संशोधन साधन :—**

प्रस्तुत संशोधनासाठी संपादन चाचणी तयार करण्यात आली. त्या चाचणीच्या सहाय्याने माहिती एकत्रित केली गेली. या चाचणीमध्ये ज्ञानात्मक, आकलनात्मक व उपयोजनात्मक पातळीवरील प्रश्न विचारण्यात आले होते.

- **संशोधनाची कार्यपद्धती :—**

तयार करण्यात आलेली संपादन चाचणी शहरी, ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना देण्यात आली. मिळालेल्या प्रतिसादानुसार विश्लेषण करण्यात आले. या चाचणीत पुढीलप्रमाणे शब्द संपत्तीचे मापन करण्यात आले.

- **शब्द संपत्तीचे मापन :—**


प्रस्तुत अभ्यासामध्ये उपयोनात्मक पातळीवरील शब्द संपत्तीचे संपादन तपासण्यासाठी चाचणी मध्ये शब्दांचा वाक्यात उपयोग करा, नामापासून विशेषणे तयार करून त्यांचा वाक्यात उपयोग करा, शब्दाला प्रत्य लावून शब्द तयार करा, यांचा या प्रकारचे प्रश्न विचारण्यात आले होते. या प्रकारे एकूण ४ प्रश्न विचारले होते. त्यात प्रत्येकी एकूण १०उपप्रश्न होते. त्यांना प्रत्यकी एक गुण याप्रमाणे प्रत्येक प्रश्नाला एकूण दहा गुण होते. या प्रश्नांना ग्रामीण भागातील १६००, शहरी भागातील ८१८ व आदिवासी भागातील २०० विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला.

- **विभागवार विश्लेषण:—**

**उपयोनात्मक पातळी—विकसित शब्द संपत्ती—विभागवार विश्लेषण**

| **विभाग** | **शेकडा संपादन पातळी** |
|---|---|
| ग्रामीण | २९.२५% |
| शहरी | २५.१५% |
| टादिवासी | २०.२८% |

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies




वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की,

१. शहरी—ग्रामीण, शहरी—आदिवासी भागातील व ग्रामीण—आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या उपयोजनात्मक पातळीवरील शब्द संपत्तीच्या संपादनात फरक आहे.

२. तीनही भागातील विद्यार्थ्यांची उपयोजन पातळीवरील विकसित शब्द संपत्तीची पातळी ५० टक्के पण नाही.


३. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची विकसित शब्द संपत्ती शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या शब्द संपत्तीपेक्षा जास्त विकसित आहे.

४. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची उपयोजन पातळीवरील शब्द संपत्ती शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपेक्षा कमी विकसित झालेली आहे.

**शहरी, ग्रामीण व आदिवासी भागातील मुले उपयोजनात्मक पातळीवरील विकसित शब्द संपत्ती**

| **विभाग** | **शेकडासंपादनपातळी** |
|---|---|
| ग्रामीण भागातील मुले | २७.५०% |
| शहरी भागातील मुले | २०.००% |
| टादिवासी भागातील मुले | २०.००% |

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*




वील विश्लेषणावरून असे दिसून येते की,

१. शहरी भागातील व ग्रामीण भागातील मुलांच्या उपयोजन पातळीवरील विकसित शब्द संपत्तीमध्ये फरक आहे.


२. ग्रामीण भागातील व आदिवासी भागातील मुलांच्या उपयोजन पातळीवरील विकसित शब्द संपत्तीपेक्षा जास्त विकसित आहे.

३. मात्र शहरी भागातील व आदिवासी भागातील मुलांची उपयोजन पातळीवरील विकसित शब्द संपत्ती सारखीच आहे.

**शहरी, ग्रामीण व आदिवासी भागातील मुली उपयोजनात्मक पातळीवरील विकसित शब्द संपत्ती**

| **विभाग** | **शेकडा संपादन पातळी** |
|---|---|
| ग्रामीण भागातील मुली | ३०.००% |
| शहरी भागातील मुली | ३०.००% |
| टादिवासी भागातील मुली | २०.००% |

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies




वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की,

१. शहरी, ग्रामीण, आदिवासी भागातील मुलींच्या उपयोजनत्मक पातळीवरील शब्दसंपत्तीमध्ये फरक आहे.


२. मुलींच्या आलेखावरून असे दिसते की, शहरी भागातील मुलींच्या आलेखाचा खालील ३० टक्के भाग ग्रामीण भागातील मुलींच्या आलेखाच्या उजवीकडे आहे. याचा अर्थ शहरी भगातील सर्वसामान्यापेक्षा खालच्या गटातील मुलींची उपयोनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती ग्रामीण भागातील मुलींच्या विकसित शब्द संपत्तीपेक्षा चांगली आहे. मात्र शहरी भागातील मुलींच्या आलेखाचा ७० टक्के भाग ग्रामीण भागातील मुलींच्या आलेखाच्या डावीकडे आहे. याचा अर्थ शहरी भागातील सर्वसामान्यापेक्षा वरच्या गटातील मुलींची उपयोजनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती ग्रामीण मुलींच्या शब्दसंपत्तीपेक्षा कमी आहे.

**३.** आदिवासी विभागाचा आलेखाचा खलील ३० टक्के भाग शहरीभागातील मुलींच्या आलेखाजवळच आहे. तर ग्रामीण विभागाच्या आलेखाच्या उजवीकडे आहे. याचा अर्थ सर्वसामान्यापेक्षा खालील गटातील शहरी व आदिवासी विभागातील मुलींची उपयोजनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती सारखीच आहे. तर ग्रामीण विभागातील मुलींपेक्षा आदिवासी विभागातील मुलींची उपयोजनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती जास्त आहे. मात्र आदिवासी विभागातील मुलींच्या आलेखाचा वरील ७० टक्के भाग शहरी विभागातील व ग्रामीण विभागातील मुलींच्या आलेखाच्या पूर्णत: डावीकडे आहे. याचा अर्थ सर्वसामान्यापेक्षा वरील गटातील शहरी विभागातील व ग्रामीण विभागातील मुलींच्या पेक्षा

आदिवासी विभागातील मुलींची उपयोजनात्मक पातळीवरील विकसित शब्द संपत्ती कमी आहे.

**शहरी भागातील मुले—मुली उपयोजनात्मक पातळीवरील विकसित शब्द संपत्ती**

| **विभाग** | **शेकडासंपादनपातळी** |
|---|---|
| शहरी भागातील मुले | २०.०० % |
| शहरी भागातील मुली | ३०.००% |





वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की,

१. शहर विभागाच्या आलेखावरून असे दिसते की, मुलांचा आलेख मुलींच्या आलेखाच्या पूर्णतः उजवीकडे असलेला दिसून येतो. याचा अर्थ शहरी भागातील मुलांची उपयोनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्ती मुलींच्या उपयोजनात्मक पातळीवरील विकसित शब्दसंपत्तीपेक्षा कमी आहे.

**ग्रामीणभागातील मुले—मुली उपयोजनात्मक पातळीवरील विकसित शब्द संपत्ती**

| **विभाग** | **शेकडा संपादन पातळी** |
|---|---|
| ग्रामीण भागातील मुले | २७.५० % |
| ग्रामीण भागातील मुली | ३०.०० % |

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies





वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की,

१. ग्रामीण विभागाच्या आलेखावरून असे दिसते की, मुलांच्या आलेखाचा खालील ३० टक्क्यांपर्यंतचा भाग मुलींच्या आलेखाच्याजवळ असलेला दिसून येतो. याचा अर्थ ग्रामीण भागातील सर्वसामान्यापेक्षा खालच्या गटातील मुलांची व मुलींची उपयोजनात्मक पातळीवरील विकसित शब्द संपत्ती सारखिच विकसित आहे. मात्र ७० टक्क्यांच्या वरील आलेखाच्या निरीक्षणावरून वरच्या पातळीवरील विकसित शब्द संपत्तीमध्ये ग्रामीण भागातील मुलांची विकसित शब्दसंपत्ती मुलींच्या विकसित शब्दसंपत्तीपेक्षा कमी आहे.

**आदिवासी भागातील मुले—मुली उपयोजनात्मक पातळीवरील विकसित शब्द संपत्ती**

| **विभाग** | **शेकडा संपादन पातळी** |
|---|---|
| ग्रामीण भागातील मुले | २०.०० % |
| ग्रामीण भागातील मुली | २०.०० % |

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*




वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की,

१. उपयोजन पातळीवरील शब्द संपत्तीवरील प्रभूत्व आदिवासी भागातील मुलांचे २०.०० टक्के तर मुलींचे २०.०० टक्के आहे. मात्र ही संपादन पातळी खूपच कमी आहे असे दिसून येते.

२. आदिवासी मुले व मुली यांच्या उपयोजन पातळीवरील विकसित शब्दसंपत्तीमध्ये काही फरक नाही. दोघांचीही उपयोजन पातळीवरील विकसित शब्द संपत्ती सारखीच विकसित आहे.

- **संदर्भ :—**

*कंदीकर, सुरेश व मंगरूळकर मीना, (२००६) प्रथम भाषा प्रादेशिक भाषा मराठी, दुसरी आवृत्ती, कोल्हापूर, फडके प्रकाशन*
*कदम,चा,प, आणि चोधरी, बा,आ, (२००६), शैक्षणिक मूल्यमापन, पुणे, नूतन प्रकाशन*
*देशपांडे,वा,सू, (१९९१), उद्दिष्टपूर्तीसाठी भाषा शिक्षण, पुणे, महाराष्ट्र अध्यापक*
*दुनाखे, अरविंद, (२००४), मराठीचे आशययुक्त अध्यापन, पुणे, नूतन प्रकाशन*
*National Council Of Educational Research & Training, Report of the Minimum Learning Committee, Department of Education, New Delhi*
*Shrivastva, R,P, (2005) Reading Ability & School Achievement, Delhi, Commonwealth Publication*
*http://www.languageindia.com/nov2002/vocabulary.com*
*http://www.answers.com/vocabulary&r=67*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*